विद्या विकास मंडळ

रामकृष्ण महादेव साळगांवकर उच्च माध्यमिक विद्यालय

मडगांव गोवा

प्राथमिक परीक्षा - डिसेंबर २०२४

इयत्ता : बारावी | विषय : मराठी (व्दितीय भाषा) | वेळ : ३ तास

दिनांक : १७/१२/२०२४ | गुण : ८०

---

सूचना : (1) शुध्द्लेखनाचे नवीन नियम पाळावेत.

(ii) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

## विभाग 1 - व्याकरण

खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा :

1. गरीब 1

2. मर्द 1

3. स्निग्ध 1

खालील शब्दांची विशेषणे लिहा :

4. लोभ 1

5. राष्ट्र 1

6. मेहनत 1

खालील शब्दांचे विरूध्दार्थी शब्द लिहा :

7. यश 1

8. आंधळा 1

9. जीवन 1

खालील शब्दांचे लिंग बदलून लिहा :

10. गाय 1

11. साधू 1

12. बायको 1

खालील शब्दांचे वचन बदलून लिहा :

13. लखोटा 1

14. चित्रे 1

15. बगळा 1

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा :

16. एक धीट मित्र पुढे झाला आणि त्याने भांड्याचे फडके सोडले. 4

## विभाग 2 - गद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :

17. पाणबुड्यांनी वरूणदेवतेकडे कोणत्या नक्ष ाच्या पावसाची मागणी केली ? 1

18. यत्नदेवाच्या प्रासादाशिवाय काय प्राप्त होत नाही ? 1

19. लहानपणी श्यामच्या घरी खर्वस घेऊन कोण येत होती? 1

खाली दिलेली वाक्ये योग्य पर्याय निवडून पूर्ण करा :

20. डॉ. माशेलकरांचे एक शिक्षक नेहमी सांगायचे की__________ 1

अ. निसर्ग हा सर्वत मोठा कवी आहे.

आ. निसर्ग हा सर्वत मोठा गुरु आहे.

इ. निसर्ग हा सर्वात मोठा परमेश्वर आहे.

21. आशु तानाजी कडा चढताना ____________ 1

अ. ऐंशी फुटावरून खाली दरीत पडला.

आ. नव्वद फुटावरून खाली दरीत पडला.

इ. शंभर फुटावरून खाली दरीत पडला.

22. सर्कशीचा पुढील खेळ बंद करण्यात आला कारण ____________ 1

अ. लेखक कर्णिकांच्या आईचा नुकताच मृत्यू झाला होता.

आ. झुल्यावरील थरारक कामे नुकतीच संपली होती.

इ. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा खून झाल्याची बातमी नुकतीच रेडिओवरून सांगण्यात आली होती.

खालील वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा :

23. 'एका वाघाची मान गेंड्यानं फाडली होती आणि दुसरा वाघही रक्तानं माखलेला दिसत होता' 5

किंवा

'तुला दहा डबे नंतर विकत घेऊन देतो, आधी तू बाहेर पड.'

खालील प्रश्नाचे उत्तर 7 ते 8 ओळींत लिहा :

24. लेखक रमेश मंत्री यांनी मांजराचे आयुष्य जगण्याची तयारी कशी केली ? 5

किंवा

'पंत मेले राव चढले' या पाठात रावांच्या घरी फुललेल्या आनंदाचे वर्णन कसे केले आहे ?

## विभाग 3 - पद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :

25. कांदा मुळा भाजी' या अभंगाचे संतकवी कोण ? 1

26. कवी ग. दी माडगूळकरांना वेदमंत्रांहून कोणता मंत्र प्रिय आहे ? 1

27. शाळेतल्या बाई ग्रामीण मुलीबद्दल काय म्हणाल्या ? 1

खाली दिलेली कवितेच्या ओळी योग्य पर्याय निवडून पूर्ण करा :

28. जीवनावेगळे ______तळमळती। झाले मजप्रती तैसें आता ॥ 1

29. अग्नीचा पेरून जातो रात्रगर्भी ______ ॥ 1

30. गुंतलेले प्राण ह्या रानात माझे ,फाटकी ही झोपडी _____ माझे 1

(वत्स ,काळीज, वारसा , मत्स्य)

खालील पद्यांशाचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा :

31. गुरुरावस्वामी असे स्वयंप्रकाश। ज्यापुढे उदास चंद्र रवी ॥ 5

किंवा

विश्वसलो या तव वचनीं, मी,

जगदनुभवयोगें बनुनी , मी

खालील प्रश्नाचे उत्तर 7 ते 8 ओळींत लिहा :

32. 'हरिभजनावीण काळ' या अभंगात अंतरीचा ज्ञानदिवा तेवत ठेवण्यासाठी संत सोहिरोबानाथ काय करायला सांगतात ? 5

किंवा

'सांगा कसं जगायचं ?' या कवितेत जीवनाकडे पाहण्याचा कोणता दृष्टिकोण प्रकट झाला आहे ?

## विभाग 4 – लेखन

खाली दिलेल्या वाक्प्रचारांना त्याखाली दिलेल्या अर्थाचा योग्य पर्याय निवडून लिहा:

33. पोटात शिरणे________________ 1

- खूप भूक लागणे
- मिळून मिसळून राहणे
- गोंधळून जाणे
- वश करून घेणे

34. अवहेलना करणे__________ 1

- प्रार्थना करणे
- हेटाळणी करणे
- वाया जाणे
- प्राप्त होणे

35. डोळा लागणे__________ 1

- खंत वाटणे
- कार्य साधणे
- झोप लागणे
- खुलून दिसणे

36. बोळवण करणे__________ 1

- पावणी करणे
- निघून जाणे
- स्वस्तात घेणे
- पलायन करणे

खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

दोन मित्र बऱ्याच वेळा एकमेकांची थट्टामस्करी करताना एकमेकांच्या व्यंगावर बोट ठेवतात. त्यामुळे त्यांच्यातील मैत्री तुटते.मित्रांशी संभाषण करताना,विनोदनिर्मिती करताना इतरांची मनं दुखावली जाणार नाहीत याची आपण काळजी घेतली पाहिजे.प्रत्येकाची रुची, आवड भिन्न असते.त्यामुळे तुमच्या मित्राशी जुळवून घेताना त्याच्या मनाचा आदर करा.केवळ एकत्र राहिल्याने मैत्री होत नाही.बेडूक चिखलात कमळा-च्या जवळ असतो,म्हणून त्यांच्यात मैत्री होत नाही.तसेच कमळातील मध प्राशन करण्याकरिता भुंगा लांबून येतो.म्हणजे सहवासाने मैत्री होतेच असे नाही.एका पोत्यात खोबरेल तेल आणि पाणी निम्मे निम्मे टाकले तरी ते वेगवेगळे राहते, एकजीव होत नाही. तेव्हा दोन मित्रांचे जीवन दूधपाण्यासारखे एकमेकांत मिसळून जावे लागते. त्यासाठी बोलताना तरतमभाव ठेवायला हवा. 'कमी बोला व जास्त ऐका' हा त्यावरचा सोपा मंत्र. आपला संवाद वेगळया घातकदिशेने चालताय,हे ओळखून विषय बदलणे हे कौशल्याचे काम आहे. शब्द हे शस्त्र असल्याने मित्रमंडळी दुखावली जाणार नाहीत , हे पाहणे गरजेचे असते.

- अ. ह. भावे

प्रश्न : 1

37. मैत्री कशामुळे तुटते ? 2

38. बेडूक आणि भुंगा यांचे दाखले काय सूचित करतात ? 2

39. मैत्री टिकवण्यासाठी कोणती काळजी घेतली पाहिजे?

40. 'संस्कार उच्च माध्यमिकविद्यालय ' सांगे येथे संपन्न झालेल्या 'गोवा मुक्तिदिन' कार्यक्रमाचा 5
वृत्तांत 10 ते 12 ओळीत लिहा.

41. 'अभ्यास ' या विषयावर दोन मित्र/ मैत्रिणीमधील संवाद सुमारे 10 ते 12 ओळीत लिहा. 5

42. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे पंचवीस ओळींचा निबंध लिहा. 10

मी पाहिलेला अपघात

किंवा

मानवतेचे पुजारी - डॉ. प्रकाश बाबा आमटे

किंवा

एका झाडाचे आत्मवृत्त

किंवा

इंटरनेट आणि आजचा विद्यार्थी

किंवा

पशू -पक्षी बोलू लागले तर..........